म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा वा
दा. क्र. ६९९६




IRBK-0106996
IRBK-0106996

# छंदांचा राजा

— सतीशचंद्र ततकर

तुमचें छंद आाणि तुम्हीं—२.

म. ग्रं. सं. ठाणे,
क्र. ६९९६ दि
वि. मा. प्र.
IRBK-0106996

# छंदांचा राजा

लेखक

सतीशचंद्र ना. तवकर

IRBK-0106996

प्रथमावृत्ति, १९५८

सतीश प्रकाशन, दादर, मुंबई २८.

मूल्य ३० नये पैसे

लहान मुलांना उपजतच कांहीं गोष्टींची आवड असतें पोस्टाची तिकीटें, निरनिराळें पत्ते, सुंदर सुंदर चित्रें इ. जमविणें, मासे, पोपट, कुत्रा पाळणें, छायाचित्रे काढणें कितीतरी गोष्टींचीं त्यांना आवड असतें. या त्यांच्या छंदांमध्यें त्यांना जास्त प्रगति करतां यावी, त्यांना मार्गदर्शन मिळावें यासाठीं 'तुमचे छंद आणि तुम्हीं' ही पुस्तिका–माला प्रसिद्ध करण्याचें आम्हीं ठरविलें. गेल्या वर्षी मासे पाळण्याच्या छंदावर माहिती देणारें असें 'मत्स्यपालन' आम्हीं प्रसिद्ध केलें. मराठी भाषेमध्यें अशा प्रकारचें पहिलेंच पुस्तक म्हणून बाल वाचकांनीं, पालकांनीं, वृत्तपत्रकारांनीं अन् शिक्षणतज्ज्ञांनीं त्याची तोंडभरून स्तुती केली. त्यामुळें आज त्या मालेंतील दुसरें पुष्प प्रसिद्ध करण्याची वेळ आली आहे

पोस्टाची तिकीटें जमविणें हा राजांचा छंद अन् छंदांचा राजा म्हणून प्रसिद्ध आहे. लहान मुलांमध्यें तिकीटें जमविण्याएवढा प्रिय छंद दुसरा कोणताहि नाहीं म्हणूनच या पुस्तिकेला छंदांचा राजा हे नांव दिलें आहे. माझें कोणतेंहि पुस्तक प्रसिद्ध करावयाचें झालें तर माझे मित्र श्री. सतीश म. राऊत, श्री. गोविंद दा. म्हात्रे, व श्री. अविनाश ग. कोर्डे आपलीं कामें बाजूला ठेवून मला मदत करतात. त्यांच्या सहाय्याखेरीज हें पुस्तक प्रसिद्ध होऊं शकलें नसते.

या पुस्तकांतून पोस्टाच्या तिकीटांचा संग्रह करणाऱ्या बालवाचकांना माहिती व मार्गदर्शन होईल अशी आशा वाटते.

गांधीजयंति,
२ ऑक्टोबर, १९५८

सतीश लवंकर

28299



शेजारचा दिलीप मला एक दिवस सांगू लागला, ‘मी बघ किती तिकीटें जमविली आहेत. सगळ्या देशांची आहेत; भारताची तर काय? भरपूर! तुला पहायचेत्?’ अन् माझ्या होय म्हणण्याची वाट न पाहतांच त्यानें खिशांतून जवळ जवळ सत्तर–ऐंशी तिकीटें काढली. मी ती पाहूं लागलों. परदेशांची तिकीटेंसुद्धां खूप होती. कित्येक तर सहसा इतरत्र न आढळणारी अशी होती. ‘हें बघ, हें ऑलिंपिक सामन्याचें, हें महात्मा गांधींचें, हें पंचवार्षिक योजनेचें ही बघ, ही एलिझाबेथ राणी!’ तो मला सांगू लागला.

त्याचा हा संग्रह पाहून झाल्यावर मी त्याला विचारलें, ‘कायरे, ही सर्व तिकीटें अशी खिशामध्यें ठेवतोस तर ती हरवत नाहींत?’ थोडासा नाराज होऊन तो म्हणाला, ‘हरवतात रे, पण काय करणार माझ्याकडे आल्बमच नाहीं!

मला वाटतें, तिकीटें जमविणाऱ्या बऱ्यांच मुलांची आमच्या दिलीपसारखीच स्थिती असते. बऱ्याच वेळीं एखाद्या साध्या वहीमध्येंहि मुलें तिकीटें चिकटवतात. तिकीटें कशीं जमवावीं, कोणती जमवावीं, कशी चिकटवावी वगैरे गोष्टींची माहिती करून घेण्यापूर्वी आपण प्रथम या पोस्टाच्या तिकीटांची कुळकथा पाहूं.

## कुळकथा

भारताच्या प्राचीन देवळांप्रमाणेंच भारताची टपालपद्धतहि प्राचीनच आहे. तुम्हीं इतिहासामध्यें वाचलेंच असेल कीं पर्शियन इतिहासतज्ज्ञ फरिश्ता यानें लिहून ठेवलें आहे कीं १५४१ मध्यें शेरशहानें बंगालपासून सिंध पर्यंत २,००० मैल लांबीचा रस्ता बांधला होता,


आणि त्यावरून त्याचें टपालवाहक धांवत असत. १४ व्या शतकाच्या मध्यांमध्यें इब्नबतुता भारतांत आला होता. त्यावेळीं महमद बीन तुघलक हा राज्य करीत होता. त्यानें आपल्या पत्रांची ने-आण करण्यासाठी दर चार मैलावर टपाल-वाहक ठेवलें होते. त्याखेरीज म्हैसूरचा राजा चिक देवराज व दक्षिणेंत टिपू सुलताना यांनीं आपल्या राज्यांत उत्कृष्ट टपाल पद्धत ठेवली होती.

ब्रिटीश लोकांनीं लॉर्ड क्लाईव्हच्या वेळीं म्हणजे १७६७ च्या सुमारास हिंदुस्थानांत टपाल पद्धत सुरू केली. त्यावेळीं फक्त सरकारी पत्रांचीच ने-आण केली जाई. पण नंतर अवघ्या सात वर्षांत म्हणजे १७७४ सालीं जनतेचें टपाल नेण्यास सुरुवात झाली. मात्र जरी टपाल पद्धत सुरू झाली तरी तेव्हां कागदाची तिकिटें निघाली नव्हती दोन आण्यामध्यें शंभर मैलापर्यंत कितीहि वजनाचें पत्र पाठवितां येई. आणि हें दोन आण्याचें तिकीट तांब्याचें असे.

१८५२ सालीं हिंदुस्थानांत सिंधचे कमिशनर श्री. बाटले फ्रेरी यांनीं कागदाची पोस्टाची तिकीटें काढली. इंग्लंडच्या पेनी पोस्टेजच्या धर्तीवर स्वस्त दरांत



टपाल ने-आण करण्याची व्यवस्था केली. १८५४ सालीं कलकत्याला प्रथम कागदाची तिकीटें छापण्यांत आलीं. या तिकीटांवर व्हिक्टोरिया राणीचें छायाचित्र होते व ½, १, २ व ४ आणे किंमतीची ही तिकीटें होती. १८८२ पर्यंत या तिकीटांवर East India Postage असें शब्द असत पण नंतर मात्र इंग्रजांनीं सत्ता आपल्या हातीं घेतल्यानंतर India Postage एवढेंच




शब्द ठेवलें आणि तें आजपर्यंत चालूंच आहे. १९२६ पर्यंत म्हणजे नाशिक येथें 'इंडिया सिक्युरिटी प्रेस' हा छापखाना निघेपर्यंत भारतांतील तिकीटांना पाठीमागें गोंद लावलेला नसे. १९२६ नंतर पाठीमागें गोंद लावलेला खास कागद वापरण्यांत येऊं लागला. अशा तऱ्हेनें भारतामध्यें पोस्टाची तिकीटें प्रचारास आलीं.

ही झाली तिकीटांची कुळकथा. आतां आपण तिकीटें कशी मिळवावी, आल्बममध्यें कशी चिकटवावी वगैरे माहिती आतां आपण करून घेऊं.

## तिकीटें कशीं मिळवावी ?

आपण जी तिकीटें जमवितों ती आपल्याकडे आलेल्या पत्रावरील काढून घेऊन, आपल्या कडील तिकीटांची दुसऱ्यां कडील तिकीटांशी बदली करून किंवा विकत आणून जमवितो. आपल्याकडे आलेल्या पत्रांवरील तिकीटें काढतांना खूप मुलें एखादा कोंपरा सोडवून घेऊन हातानेंच खेंचून काढण्याचा प्रयत्न करतात. आणि अशा वेळीं कित्येक तिकीटें फाटतात. फाटलेल्या

किंवा खराब झालेल्या तिकीटांना तुमच्या संग्रहांत स्थान देऊं नका. हीं कागदावर चिकटलेली तिकीटें काढण्याचा अगदीं सोपा मार्ग आहे.

एखाद्या उथळ झांकणींत किंवा बशींत पाणी घ्या. आणि त्यावर कागदावर चिकटलेलें तिकीट टाका. शक्यतों तिकीटाची चित्र असलेली बाजू पाण्यांत भिजून देऊं नका. साधारण अर्धा तास जर तिकीट अशा तऱ्हेनें भिजलें तर त्याच्या पाठीमागचा कागद अगदी व्यवस्थित-पणें अन् आपोआप बाजूला होतो. नंतर दोन टीप कागदांमध्यें अशातऱ्हेचीं तिकीटें ठेवून वरून दाब दिल्यानंतर तीं लवकर वाळतात व तिकीटाच्या बाजूचें करवे करवे नीट राहतात. तें करवें फाटलें तरीदेखील तिकीटाची किंमत कमी होते हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

तिकीटांचीं अदलाबदल करतांनासुद्धां आपण योग्य किंमतीच्या तिकीटाशीं योग्य तिकीटच बदलत आहों याची खात्री करून घ्यावी. आपण देत असलेल्या व घेत असलेल्या तिकीटांतील कोणताहि कोंपरा दुमड-लेला, फाटलेला नाहीं याची खात्री करावी. मुख्य म्हणजे आपल्याकडे जर एखाद्या प्रकारची एकापेक्षां अधिक तिकीटें असतील तरच अदलाबदल करावी. तिकीटांचीं आदलाबदल करण्यासाठी परदेशीं पत्रमित्र असणें फार चांगलें. त्यामुळें त्याच्या देशांतील हवी तेवढी तिकीटें तो आपल्याला पाठवूं शकतो व आपल्या भारतांतीलहि बरींच तिकीटें आपल्याला पाठवितां येतात.

आतां तिकीटें जमविण्याचा तिसरा मार्ग म्हणजे तिकीटें विकत घेणें. मुंबईसारख्या शहरांत तिकीटें विकणारे अनेक दुकानदार असतात. यांच्याकडे अगदीं एखाद्या विशिष्ट देशाच्या विशिष्ठ संचापासून सर्व

जगाच्या पांचशें, एक हजार तिकीटांचीं पॅकेट्स् विकण्या-साठीं ठेवलेली असतात. स्वस्त किंमतींत मिळणाऱ्या पॅकेटस्‌मध्यें बऱ्यांचवेळां फाटकीं, कोंपरे दुमडलेलीं तिकीटें असतात. अर्थात् अशा प्रकारचीं पाकिटें फार मोठ्या प्रमाणावर तयार केली जात असल्यामुळें असें होणें शक्य असते. तरी पण अशा तऱ्हेची तिकीटें आपण आपल्या संग्रहांतून बाजूला काढून टाकणेंच योग्य.

## वर्गीकरण करणें

अशा तऱ्हेनें तिकीटें मिळविल्यानंतर त्यांचें वर्गीकरण करणें आवश्यक आहे. आपल्याकडे जमलेली तिकीटें वेगवेगळ्या देशाप्रमाणें वेगवेगळी काढावी. त्यानंतर प्रत्येक देशांमध्यें निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळें संच काढलें जातात. उदाहरणार्थ आपल्या भारतांतच पहायचें झालें तर पूर्वी राजाच्या मुखवट्याची तिकीटें होती. नंतर भारत सरकारनें आपली तिकीटें काढली. मध्यंतरी पंचवार्षिक योजनेबद्दल माहिती देणारीं तिकीटें काढली होती. सध्यां नव्या पैशांची तिकीटें आहेतच. अशा तऱ्हेचें वेगवेगळे संच असतात. तें वेगवेगळे काढल्यानंतर त्यांच्या किंमतीप्रमाणें तें लावावें.

कित्येक देश आपल्या तिकीटांवर आपल्या देशाचें नांव लिहित नाहींत. चीन व जपान देश आपल्या भाषेंत नांवें लिहितात. युगोस्लाव्हिया, बल्गेरिया, ग्रीस, रशिया वगैरे देश रशियन किंवा ग्रीक भाषेंत नांवें लिहितात. ग्रेट ब्रिटनच्या तिकीटांवर नुसतेंच 'पोस्टेज' व 'पोस्टेज अॅंड रेव्हेन्यू' असें लिहिलेलें असतें व तिकीटांवर राजा किंवा राणीचा मुखवटा असतो. कित्येक देशांचीं नांवें तिकीटांवर दिलेल्या नांवांहून वेगळींच असतात. अशा देशांचीं नांवें व तिकीटांवरचीं नांवें यांच पुस्तिकेंत इतरत्र दिली आहेत ती पहावी. असें वेगवेगळें संच

वेगवेगळ्या पाकीटांत ठेवावें. आपल्या घरीं येणाऱ्या पत्रांची पाकीटें यासाठीं आपल्याला उपयोगांत आणतां येतात. या पाकीटांवर बाहेर कोणत्या देशाची तिकीटें आहेत, किती आहेत व कोणत्या संचाची आहेत हें लिहून ठेवावें. म्हणजे एखादें तिकीट हवें असल्यास पटकन् शोधून काढतां येईल.

## आल्बममध्यें चिकटवणें

अशा तऱ्हेनें सर्व तिकीटें वेगवेगळीं व संचांप्रमाणे काढल्यानंतर ती चिकटाविण्यास घ्यायला हरकत नाहीं. शक्यतों तिकीटें चिकटाविण्यासाठीं छापील आल्बम मिळतो तो घ्यावा. त्यामध्यें बऱ्यांचवेळां प्रत्येक पानावर ए, बी, सी, डी ऱ्या क्रमानें देशांची नांवें छापलेली असतात त्याचप्रमाणें प्रत्येक तिकीटासाठीं जागा आंखून दाखविलेली असते.

तिकीटें चिकटविण्याआधीं पुनः एकदां सर्व तिकीटें नीट तपासून पहावीं. ही अशी तिकीटें सर्वांत कमीत कमी-दरांपासून अधिक दरांपर्यंत लावून ठेवावी. ही तिकीटें चिकटवण्यासाठीं बाजारामध्यें हिंजिस ( hinges ) मिळतात तें वापरावें. संपूर्ण तिकीट कधींहि चिकटवूं नये. त्याचप्रमाणें आपण घरीं कागदाच्या पट्ट्या करून देखील चिकटविणें तितकेसें योग्य होत नाहीं. या साधारण १००० हिंजिस्ना फारच थोडी किंमत पडतें. या हिंजिसना गोंद लावलेलाच असतो. त्यापैकीं अर्धी बाजू तिकीटावर व उरलेली अर्धी आल्बमला चिकटवावी. अशा तऱ्हेनें लावलेलें तिकीट केव्हांहि अगदीं सहज, तिकीट किंवा आल्बम खराब न करतां, काढतां येतें.

अशा तऱ्हेनें नीट, व्यवस्थित लावलेली तिकीटें पाहून कुणीहि आनंदित होईल. अशा तऱ्हेनें तिकीटें

चिकटविलेला आल्बम तुम्हीं कोठेंहि कसाहि घेऊन जाऊं शकतां, कुणालाहि दाखवूं शकतां. पुनः एखादें तिकीट हरवलें, फाटलें असें होणार नाहीं. त्याचें करव्याकरव्यांचें कोपरें खराब होणार नाहींत.

## अभ्यास

अशा तऱ्हेनें सर्व तिकीटें चिकटाविणें झाल्यावर मग पुनः तुमचा संग्रह बारकाईनें बघण्यास घ्या. आतां आपण भारताची तिकीटें घेऊं. १५ ऑगस्ट १९४९ रोजीं निघालेल्या संचामध्यें अजंठा लेण्यांतील चित्र, कोनाराक येथील घोडा, त्रिमूर्ती, बोधीसत्व, नटराज, सांची स्तूप, बुद्धगया देऊळ, भुवनेश्वर, गोल घुमट, खजुराहोचें महादेव मंदिर, अमृतसरचें सुवर्ण देऊळ, चितोडगडचा व्हिक्टरी टॉवर, लाल किल्ला, ताजमहाल, कुतुबमिनार व शत्रूंज्या देऊळ इत्यादि चित्रें आहेत. (मुखपृष्ठ पहा) आतां या प्रत्येक तिकीटाचा आपण अभ्यास करूं.

३ पैचे पहिलें तिकीट पहा. अजंठा येथील सुप्रसिद्ध लेण्यांतील एका स्तंभावरचें हें चित्र आहे. इसवी सनानंतर पांचव्या शतकांत ही लेणीं कोरलीं होती.

६ पैच्या तिकीटावर ओरिसांतील कोनाराक या ठिकाणच्या सूर्यमंदिरांतील एक सुंदर शिल्पकला दाखविली आहे. हें देऊळ इसवी सनानंतर १२३८–१२६४ या काळांतील आहे.

९ पैच्या तिकीटावरील त्रिमूर्ती तुमच्या परिचयाची असेलच. इसवी सनानंतर आठव्या शतकांत कोरलेल्या घारापुरी लेण्यांतील हीं शिवमूर्ती आहे.

एक आण्याच्या तिकीटावर असलेलें बोधिसत्व सिंहानंद लोकेश्वराचें चित्र सध्यां लखनौ येथील प्रादेशिक वस्तुसंग्रहालयांत आहे.

दोन आण्याच्या तिकीटावर नटराजाचें चित्र आहे. ब्रॉझ धातुपासून बनविलेला हा शिवाचा पुतळा मद्रास

राज्यांतील तिरूवेलगड्ड येथील असून तो इसवी सनानंतर ११०० सालांतील आहे.

तीन आण्याच्या तिकीटांवर मध्य भारतांतील सांची स्तूपाच्या पूर्वेकडील प्रवेश द्वाराचें चित्र आहे. इसवीसन पूर्व एक–दोन शतकांमध्यें हें स्तूप बांधलें होतें.

साडेतीन आण्याच्या तिकीटावर बुद्ध गया देऊळ आहे. भगवान बुद्धांना ज्या ठिकाणी ज्ञान प्राप्त झालें तींच ही जागा. इसवी सनानंतर सहाव्या शतकांत येथें देऊळ बांधण्यांत आलें.

चार आण्याच्या तिकीटावर असलेलें भुवनेश्वर हें लिंगराजाचें देऊळ असून ओरिसांतील देवळांमध्यें तें अतिशय प्रसिद्ध आहे. इसवी सनानंतर १००० वर्षांनीं तें बांधलें.

सहा आण्याच्या तिकीटावर महंमद आदिलशहानें बांधलेल्या विजापूर येथील गोल घुमटाचें चित्र आहे. जगांतील मोठ्या घुमटांमध्यें विजापूरच्या घुमटाची गणना केली जाते. हा घुमट साधारण १६२६ ते १६५६ च्या दरम्यान बांधला.

आठ आण्याच्या तिकिटावरील महादेव मंदिर हें उत्तर हिंदुस्थानांतील एक अति प्रसिद्ध देऊळ आहे. बुंदेल खंडातील खजुराहो येथील हें मंदिर इसवी सनानंतर दहाव्या शतकांत बांधलें आहे.

बारा आण्याच्या तिकीटावर अकबराच्या काळांत म्हणजे १५५६–१६०५ मध्यें बांधलेल्या सुवर्ण मंदिराचें चित्र आहे. अमृतसरचें हें मंदिर १७७६ मध्यें पुनः बांधणें आवश्यक झालें होतें.

एक रुपयाचें तिकीट चितोडगड येथील व्हिक्टरी टॉवर दाखवीत आहे. नऊ मजल्यांचा हा संगमरवरी मनोरा १४४२–१४४९ काळांतील आहे.

दोन रुपयांच्या तिकीटावर दिल्लीचा लाल किल्ला आहे. शहाजहान राजानें तो १६३८ ते १६४८ या कालांत बांधला होता.

पांच रुपयांच्या तिकीटावर आग्र्याचा सुप्रसिद्ध ताजमहाल आहे. मुमताज महलच्या स्मृतिनिमित्त १६३१ ते १६४८ मध्यें शहाजहाननें बांधलेला हा महाल आज जगांतील एक आकर्षण होऊन बसला आहे.

दहा रुपयांच्या तिकीटावर २३८ फूट उंच असा कुतुबमिनार दाखविला आहे. तो इसवीसनानंतर ११–१२ व्या शतकांत बांधण्यांत आला.

पंधरा रुपयांच्या तिकीटावर पश्चिम भारतांतील अनेक सुंदर सुंदर जैन मंदिरांपैकीं पालिटाण्याचें शत्रूंज्या मंदिर दाखविलें आहे. हें मांदिर इसवीसनानंतर १६१८ सालीं बांधलें.

हा झाला एका देशाच्या एका संचाचा अभ्यास. अशी प्रत्येक देशाच्या प्रत्येक संचाची माहिती करून घेतली पाहिजे. त्या ठिकांणाचें भौगोलिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व लक्षांत घेतले पाहिजे. आणि या गोष्टी तुम्हीं बघितल्यावर हींच तिकीटें तुम्हांला तुमच्या अभ्यासांतहि मदत करतील.

अशा रितीनें तयार केलेला तुमचा आल्बम तुम्हांला तर भूषणावह होईलच पण त्यामुळें इतरांनाहि आनंद होईल.

## हवाई–डाक तिकीटें

ब्रिटिश कॉमनवेल्थमध्यें हवाई–डाक तिकीटें काढणारा भारत हांच पहिला देश आहे. १९२९ सालीं भारतांत खास प्रकारच्या हवाई डाक तिकीटांचा संच काढ-



ण्याचा पहिला मान भारतानें मिळविला व २, ३, ४, ६, ८ व १२ आण्याचीं तिकीटें काढलीं. या तिकीटांचें डिझाईन श्री. ग्रँट यांनीं केलें होतें.

## प्रथम दिन पाकीटें

नवीन तिकीट किंवा संच विक्रीला येतो तेव्हां बहुतेक वेळीं टपालखातें 'प्रथम दिन पाकिटें' काढीत असते. बरेंच लोक या तिकीटां बरोबरच प्रथम दिन पाकीटांचाहि संग्रह करतात. बऱ्याच वेळीं नवीन तिकीट ज्या दिवशीं विक्रीस येतें त्या दिवशीं एक खास शिक्का तिकीटांवर मारतात. अशा तऱ्हेची खास शिक्का असलेली प्रथम दिन पाकीटेंहि एखाद्या वहींत नीट लावून ठेवावीं. त्याच वहींत त्या त्या पानावर त्या विशिष्ट तिकीटाबद्दल किंवा संचाबद्दल माहिती जमवून लिहावी. यामुळें आपल्याबरोबरच इतरांनाहि तें तिकीट कशाबद्दल आहे, हा संच कां काढला आहे वगैरे गोष्टींचें ज्ञान होईल. ( मलपृष्ठ क्र. ३ पहा )


टपालखात्यातर्फें प्रकाशित होणाऱ्या या खास तिकीटांचीं विक्री किती होते यांचे आंकडे तुम्हांला मनोरंजक वाटतील.



| | | |
|---|---|---|
| स्वातंत्र्यदिन तिकीटें १९४७ | रु. | ३६,३४,१२६ |
| गांधी स्मृति संच १९४८ | ,, | ५५,१८,९०२ |
| युनिव्हर्सल पोस्टल युनियन १९४९ | ,, | १०,१७,४४६ |
| प्रजासत्ताक दिन तिकीटें १९५० | ,, | ६२,४६,१५२ |
| भूगर्भ विषयक पाहणी तिकीटें १९५१ | ,, | ९,४८,५५५ |
| प्रथम आशियाई सामनें तिकीटें १९५१ | ,, | २६,५१,६७१ |

## चुकाच मूल्य

कित्येक वेळीं तिकीटें छापतांना किंवा त्यासाठीं चित्रें निवडतांना त्यांत चूक होते. अर्थात् पुढें लक्षांत आल्याबरोबर लगेच ही चूक सुधारली जाते. अशा वेळीं या चुकीच्या चित्रांच्या तिकीटांना अतिशय किंमत येते, आणि हीं तिकीटें दुर्मिळ होतात. या पुस्तिकेंमध्यें मी ज्या संचाची तुम्हांला माहिती दिली आहे त्यांतील एक आणा किंमतीचें तिकीटसुद्धां असेंच चुकीचें आहे. मुखपृष्ठावर छापलेल्या एक आण्याच्या तिकीटावरील बोधिसत्वाची मूर्ती उलट दाखविली आहे. तुमच्या ही गोष्ट नीट लक्षांत यावी यासाठीं पुनः सुधारून छापलेलें व चुकीचें अशी दोन्हीं तिकीटें पुढें देत आहे. ही चूक लक्षांत आल्याबरोबर लगेच चूक सुधारून नवीन तिकीटें काढली गेलीं.



या तुम्हीं जमवित असलेल्या तिकीटांना कांहीं वर्षांनीं अतिशय किंमत येते. कित्येक दुर्मिळ तिकीटें हजारांच्या भाषेंत विकलीं जातात. म्हणूनच छंद म्हणून जमविलेली ही तिकीटें विकतांना कित्येकजण शेंकडों रुपये जमवून बसले आहेत.

## काय करूं नये ?

अशा रितीनें तयार केलेला तुमचा आल्बम आतां संपूर्ण झाला. आतां तुम्हीं काय करूं नयें तें पुनः एकदां सांगतो—

१ आल्बममध्यें तिकीट चिकटवतांना केवळ गोंदानें किंवा हिंजिस शिवाय चिटकवूं नका. हिंजिसनें तिकीट चिकटविल्यानें तिकीट व आल्बम दोन्हींहि खराब होत नाहींत.

२ खराब झालेली किंवा फाटलेली तिकीटें आल्बम-मध्यें चिकटवूं नका. अशा एखाद्या तिकीटा-मुळें तुमच्या आल्बमच्या त्या पानाचें सौंदर्य कमी होईल.

३ त्याचप्रमाणें एखाद्या तिकीटावर पोस्टाच्या शिक्क्याखेरीज इतर कांहीं मजकूर शाईनें वगैरे लिहिलेला असेल तर तें तिकीट तुमच्या आल्बममध्यें लावूं नका.

४ तिकीटाच्या मागील बाजूस कोणत्याहि प्रकारचा कागद चिकटलेला राहून देऊं नका. तो आधीं पाण्यांत भिजवून काढून टाका व नंतरच तें तिकीट आल्बममध्यें लावा.

५ तिकीटावरील देश जर समजला नाहीं तर या पुस्तकाचा शेवटीं दिलेल्या यादींत देश शोधा व त्याचप्रमाणें तिकीट चिकटवा.

म. प्र. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्रॉ... ६८८५... नों. दि ..........
वि. ........बा.वा... क्र. ..............

## हें तिकीट कोणत्या देशाचें ?

कांहीं तिकीटांवरील शब्दांवरून तें तिकीट कोणत्या देशाचें आहे याचा बोध होत नाहीं. यासाठीं पुढें तिकीटांवर लिहिलेलें शब्द व तीं तिकीटें कोणत्या देशाचीं आहेत त्यांचीं नांवें दिली आहेत.


| | |
|---|---|
| BAYERN | Bavaria |
| BELGIQVE, BELGIE | Belgium |
| DANSK-VESTINDIE | Danish West Indies |
| DEUTSCHOSTERREICH | Austria |
| DEUTSCHES REICH | Germany |
| EESTI | Estonia |
| EMPIRE FRANC. | France ( old ) |
| ETHIOPIE | Abyssinia |
| FILIPINAS | Philippine Is. |
| H. I. & U. S. POSTAGE | Hawai |
| HELVETIA | Switzerland |
| ISLAND | Iceland |
| MACAU | Macao |

क्र. ६०९९६
दि. ०८/०९


| | |
|---|---|
| MAGYAR | Hungary |
| NEDERLAND | Holland |
| NED. INDIE | Dutch Indies |
| NORGE | Norway |
| OSTERREICH | Austria |
| OTTOMANES | Turkey |
| PACCHI POSTALE | Italy |
| POCZTA POLSKA | Poland |
| POHJOIS, INKERI | Ingermanland |
| PORTUGUESA | Portugal |
| PREUSSEN | Prussia |
| PUERTO RICO | Porto Rico |
| SAARGEBIET | Saar |
| TOUVA | North Mangolia |

IRBK-0106996


मुद्रक : कृष्णाजी नारायण सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
प्रकाशक : सतीश मधुकर राऊत, गणेश निकेतन, १२४, शिवाजी पार्क, मुंबई २८.




S.N.D.T. WOMEN'S UNIVERSITY, BOMBAY
Dr. D. K. KARVE
INDIAN POSTS AND TELEGRAPHS
BOMBAY

To,
Satish & Kumar Tavkar,
C/o: N. G. Tavkar Esqr.,
Mohan Bhuvan,
Gokhale Road (North),
Dadar, Bombay-14.
BOMBAY
G.P.O.
23-7-56

बाल दिन
14-11-57
बाल दिन
14 NOV 1957
BOMBAY G.P.O.

2500th BUDDHA JAYANTI
24. 5. 56
FIRST DAY COVER
INDIA